MHLA020019282026

# <u>वारसा प्रमाणपत्र क्र.९५८/२०२६ मधील निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश</u>

## <u>[ ज्ञानमती व इतर ..वि.. निरंक ]</u>

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केला आहे.

### <u>अर्जातील थोडक्यात मतितार्थ खालीलप्रमाणे आहेः–</u>

२. मयत **हरीश्चंद्र जयराम मौर्या** यांची अर्जदार क्र.१ आई, अर्जदार क्र.२ पत्नी व अर्जदार क्र.३ मुलगा आहे. **हरीश्चंद्र जयराम मौर्या** यांचा दिनांक ०५/०२/२०२३ रोजी डॉ.वसंतराव पवार मेडीकल कॉलेज, आडगांव, नाशिक येथे मृत्यू झाला आहे. अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

३. मयत **हरीश्चंद्र जयराम मौर्या** यांचे वारस या नात्याने अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेकरिता दाखल केला आहे.

४. सदर अर्जाच्या अनुषंगाने 'दैनिक विश्वउदय' या वृत्तपत्रामध्ये दिनांक ०१/०७/२०२६ रोजी जाहीर प्रगटन देण्यात आले. सदर जाहीर प्रगटनास कोणीही आक्षेप घेतला नसल्याने प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले.

५. अर्जदार क्र.२ कुसूमावती हरिश्चंद्र मौर्या यांनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ **<u>नि.क्र.१०</u>** वर शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदार यांनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ **हरीश्चंद्र जयराम मौर्या** यांच्या मृत्यू दाखल्याची प्रत **<u>नि.क्र.११</u>**, अर्जदार यांच्या आधार कार्डच्या प्रती **<u>नि.क्र.८/१ ते ८/३</u>**, जि.प.प्रा.शा.,खडी केंद्र (नांदगाव), ता.लातूर यांनी जारी केलेले अर्जदार क्र.३ चे बोनाफाईड प्रमाणपत्र **<u>नि.क्र.८/४</u>**, शिधापत्रीकेची प्रत, दैनिक विश्वउदय या वर्तमानपत्राची दिनांक ०१/०७/२०२६

रोजीच्या अंकाची प्रत **नि.क्र.९** इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. वरील कागदपत्रांवरून मयत **हरीश्चंद्र जयराम मौर्या** यांना अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याचे दिसून येते. अर्जदार यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यास कोणताही आक्षेप आला नसल्याने त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळण्यास ते हक्कदार असल्याबद्दलचा सकृतदर्शनी पुरावा अभिलेखावर आल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेलायक असल्याचे आढळते. सबब, खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ **ज्ञानमती जयराम मौर्या**, अर्जदार क्र.२ **कुसुमावती हरिश्चंद्र मौर्या** व अर्जदार क्र.३ **करन उर्फ समाधान हरिश्चंद्र मौर्या** हे मयत हरीश्चंद्र जयराम मौर्या यांच्या वारस असल्याचे घोषित करण्यात येते.

३. अर्जदार हे मयत **हरीश्चंद्र जयराम मौर्या** यांचे पश्चात कायदेशीर वारस असल्याबाबत त्यांच्या नावे वारसाहक्क प्रमाणपत्र (Heirship Certificate) आवश्यक ते न्यायालयीन शुल्क दिल्यानंतर देण्यात यावे.

४. सदरचा दाखला स्थावर मिळकतीसंदर्भात वापरता येणार नाही.

(आदेश खुल्या न्यायालयातून घोषित करण्यात आला.)

**स्वाक्षरीत/-**

( **एफ.के.शेख** )

दिनांकः ०६/०८/२०२६. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, लातूर.